### पाणी व्यवस्थापन :

सुर्यफूलाच्या उत्पादन वाढीमध्ये पाणी व्यवस्थापनाला फार महत्व आहे. पाण्याच्या दृष्टीने सुर्यफूलाच्या बोंडे येण्याच्या, फुलोऱ्याच्या व दाणे भरण्याच्या अवस्था संवेदनशील आहेत. या अवस्थांमध्ये पाणी कमी पडू देऊ नये. जमिनीच्या प्रकारानुसार १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.

### पूरक परागीकरण :

सुर्यफूल स्वपरागसिंचित नसल्यामुळे कृत्रीमरित्या परागीकरण घडवून आणल्यास उत्पादनात २० ते २५% वाढ होते. पीक फुलोऱ्यावर असताना शेतामध्ये पुरेशा प्रमाणात मधमाशांची संख्या नसेल तर ४ ते ६ दिवस सकाळी ८ ते ११ या वेळेत फुलावरुन मलमल कापडाच्या सहाय्याने हात फिरवावा किंवा नजीकची फुले एकमेकावर घासावी, जेणे करुन बाह्य परागीकरण होण्यास मदत होते व दाणे भरण्याचे प्रमाण वाढते. सुर्यफूलाच्या शेतात मधमाशांच्या पेट्या ठेवल्याने सुद्धा परागीकरण वाढते.



### पीक संरक्षण :

सुर्यफूलाच्या पिकावर पानावरील करपा, तांबेरा व केवडा या रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो. किडींमध्ये सुरुवातीच्या अवस्थेत रस शोषणाऱ्या व पाने खाणाऱ्या अळ्यांचा प्रादुर्भाव आढळतो. पीक फुलोऱ्यात असताना घाटेअळीमुळे नुकसान होऊ शकते.

पानांवरील करपा व तांबेरा या रोगांच्या नियंत्रणासाठी २५ ग्रॅम डायथेन एम-४५ हे बुरशीनाशक प्रति १० लीटर पाण्यात मिसळून पिकावर फवारणी करावी. केवडा रोगाच्या नियंत्रणासाठी तक्त्यात दर्शविलेल्या रोगप्रतिबंधक जातीचा वापर करावा.

किडींच्या नियंत्रणासाठी मोनोक्रोटोफॉस १४ मि.ली.प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. शेतामध्ये मधमाशांचा वावर असताना फवारणी करु नये.

### काढणी व मळणी :

सुर्यफूलाची पाने पिवळी दिसू लागली व फुलांचा मागील भाग पिवळा पडू लागला की पीक काढणीला तयार झाले असे समजावे. फुलांच्या काढणीस उशीर झाल्यास बी गळून पडण्याची शक्यता असते. फुले विळ्याच्या सहाय्याने कापून उन्हात चांगली वाळवावीत. फुले काठीच्या सहाय्याने झोडून किंवा ५ मि.मी. तारेच्या जाळीवर घासून बी अलग करावे. उफणणी करुन बी साफ करुन घ्यावे व पिशव्यांमध्ये साठवणूक करुन ठेवावी.



सुर्यफूलाची वरीलप्रमाणे लागवड केल्यास हेक्टरी १५ ते २० क्विंटल (गुंठ्यास १५ ते २० किलो) उत्पादन मिळते.

(सुर्यफूलाचे दाणे भरण्याच्या अवस्थेपासून पीक काढणीपर्यंत पोपटांमुळे फार नुकसान होऊ शकते. त्यामुळे पिकाचे पोपटांपासून संरक्षण करण्यासाठी काळजीपूर्वक नियमित राखण करावी).


**लेखन व माहिती संकलन**

**श्री. भास्कर विठ्ठल काजरेकर**

विषय विशेषज्ञ (कृषिविद्या)

मोबा.९४२३८७९२७१

**प्रकाशक**

**डॉ. मंदार गीते**

कार्यक्रम समन्वयक

कृषि विज्ञान केंद्र, किर्लोस

सिंधुदुर्ग

**श्री. विवेक सावंतभोसले**

प्रक्षेत्र व्यवस्थापक

मोबा.९४०५९७४१३६

-संपर्क-

**कृषि विज्ञान केंद्र, किर्लोस**

**सिंधुदुर्ग**

मु. पो. किर्लोस, ता.मालवण,

जि.सिंधुदुर्ग-४१६६१२

फोन. (०२३६५) २८०२६२, २८०१५७


Print - Shree Ganesh / 9422381555

भाकृअनुप ICAR

सिंधुदुर्ग जिल्हा कृषि प्रतिष्ठान, किर्लोस संचालित

# कृषि विज्ञान केंद्र,किर्लोस

## सिंधुदुर्ग

## सुर्यफूल लागवड

मानवी आहारात खाद्यतेलाला फार महत्व आहे. कारण खाद्यतेलाद्वारे स्निग्धांशाची गरज भागविली जाते.आहारतज्ञांच्या मते मानवी आहारात प्रतिदिन ४० ग्रॅम खाद्यतेलाची आवश्यकता आहे. परंतु देशातील सध्याचे खाद्यतेलाचे उत्पादन लक्षात घेता सुमारे २० ग्रॅम खाद्यतेलाची गरज भागविली जाते.वेगवेगळ्या तेलबिया पिकांमध्ये अलीकडे सुर्यफूलाला फार महत्व प्राप्त झाले आहे. कमी कालावधीत सुर्यफूल लोकप्रिय होण्यामागे सुर्यफूल लागवड कमी खर्चिक आणि जास्त उत्पादन ही कारणे असावीत.सुर्यफूल कमी कालावधीत येत असल्याने या पिकास पीक पद्धतीत विशेष महत्व आहे.याशिवाय सुर्यफूलामध्ये तेलाचे प्रमाण ४० ते ४२% असल्याने हेक्टरी खाद्यतेलाचे जास्त उत्पादन मिळते.तसेच तेलामध्ये ७०% लिनोलिक आम्ल असल्यामुळे रक्तदाब व हृदयरोग असणाऱ्या लोकांसाठी सूर्यफूल तेल सेवन करणे हितावह आहे.





महाराष्ट्रात ७०% लागवड ही मराठवाडा व विदर्भात आढळते. आपल्या जिल्ह्यामध्ये सुर्यफूल लागवडीकडे शेतकऱ्याचा कल हळूहळू वाढलेला दिसतो. भुईमूग लागवड खर्चिक असल्याने बरेच शेतकरी आंतरपीक, मिश्रपिक म्हणून सुर्यफूलाची लागवड करतात; तर काही तुरळक ठिकाणी सलग पिक म्हणून लागवड करताना आढळतात. सलग लागवडीमध्ये शेतकरी घन पेरणी करीत असल्याने व सुर्यफूलाचे दाणे भरण्यासाठी कृत्रीम परागीकरण करत नसल्याने प्रति हेक्टरी उत्पादन फार कमी मिळते. त्यामुळे शास्त्रीय पद्धतीने लागवड केल्यास निश्चितपणे सुर्यफूलापासून फायदा मिळू शकतो.

### हवामान व जमीन :

सुर्यफुलाची लागवड तिन्ही हंगामात केली जाते. परंतु अधिक उत्पादनासाठी रब्बी हंगामात लागवड करावी. कारण या हंगामात पीक वाढीसाठी जास्त कालावधी मिळतो. साधारणपणे २०° ते २९° से.तापमानात या पिकाची चांगली वाढ होते. सूर्यफूल सर्व प्रकारच्या जमिनीत येऊ शकते. परंतु अधिक उत्पादनासाठी वाळूमिश्रीत पोयट्याच्या जमिनीत लागवड हितावह आहे. जमिनीचा सामू ६.५ ते ८.५ असल्यास पीक चांगले येते.

### पूर्वमशागत :

सूर्यफूलाची मुळे जमिनीत दोन फुटापर्यंत खोल जात असल्यामुळे जमिनीची २० ते २५ सें.मी खोलवर नांगरट करावी.उभी-आडवी नांगरणी करुन फळीच्या सहाय्याने ढेकळे फोडून घ्यावीत. पूर्वीच्या पिकाचे अवशेष, काडी-कचरा उचलून नष्ट करावा व शेत पेरणीयोग्य करावे. पिकाला पाणी देण्याच्या दृष्टीने छोटे-छोटे वाफे बनवून घ्यावेत.

### सुधारित जाती :

सुर्यफूलाच्या लागवडीसाठी खालील संकरित किंवा सुधारित जातींची निवड करावी.

| क्र. | जातीचे नांव | कालावधी (दिवस) | सरासरी उत्पादन (किलो/हेक्टर) | तेलाचे प्रमाण (%) | वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|---|---|
| | **संकरित जाती** | | | | |
| १ | एल.एस.एच.-३ | ९५-१०० | १४०० ते १६०० | ४० ते ४२ | केवडा रोगप्रतिबंधक |
| २ | एम.एस.एफ.एच-८ | ९५-१०० | १४०० ते १६०० | ४० ते ४२ | उत्पादनात स्थिरता |
| ३ | के.बी.एस.एच.-१ | ९०-१०० | १६०० ते १८०० | ४२ ते ४४ | तेलाचे प्रमाण अधिक |
| ४ | ज्वालामुखी | ९०-९५ | १४०० ते १६०० | ३८ ते ४० | पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता |
| ५ | एस.एच.३३२२ (कारगील) | ९५-१०० | १६०० ते १८०० | ४० ते ४२ | अधिक उत्पादन क्षमता |
| | **सुधारित जाती** | | | | |
| १ | सूर्या | ९०-१०० | १००० ते १२०० | ३६ ते ३८ | बियाण्यावर पांढरे चट्टे |
| २ | एस.एस. ५६ | ८०-८५ | ८०० ते १००० | ३४ ते ३६ | कोरडवाहू क्षेत्रास योग्य व लवकर येणारी जात |
| ३ | मॉर्डन | ८०-८५ | ८०० ते १५०० | ३४ ते ३५ | बुटकी व लवकर येणारी जात |



### बियाण्याचे प्रमाण व पेरणी

अधिक उत्पादनासाठी संकरीत जातींचाच वापर करावा. संकरीत जातीसाठी हेक्टरी ५ ते ६ किलो बियाणे लागते (प्रतिगुठ्यांस ५० ते ६० ग्रॅम)सुधारीत जातीसाठी हेक्टरी १० ते १२ किलो बियाणे लागते. पेरणीपूर्वी बियाणे १२ तास भिजवून



नंतर सावलीत वाळवावे; म्हणजे बियाण्याची सुधारित उगवण जोमदार व एकसारखी होते. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास १० ग्रॅम ट्रायकोडर्मा हे जैविक बुरशीनाशक चोळावे.

रब्बी हंगामात ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत पेरणी करावी. सुर्यफूलाची उशीरा लागवड केल्यास उत्पादन तसेच तेलाचे प्रमाण यामध्ये घट होण्याची शक्यता असते.पेरणी करताना दोन ओळीमध्ये ६० सें.मी (दोन फूट) व दोन रोपांमध्ये ३० सें.मी. (१ फुट) अंतर ठेवावे. बियाणे ५ ते ६ सें.मी. खोलीवर पेरावे व मातीने झाकून घ्यावे.

### खत व्यवस्थापन :

सुर्यफुलाला योग्य प्रमाणात खते मिळाली नाही तर दाणे चांगले भरत नाहीत व उत्पादनात घट येते. ओलीताखालील पिकासाठी हेक्टरी ६० किलो नत्र, ९० किलो स्फुरद व ६० किलो पालाशयुक्त खत बियाण्याच्या संपर्कात येणार नाही, अशा पद्धतीने द्यावे. त्यासाठी पेरणीच्यावेळी प्रति गुंठ्यास ६०० ग्रॅम युरिया, ५ किलो बोरोनेटेड सुपर फॉस्फेट व एक किलो म्युरेट ऑफ पोटॅश खत, ५० किलो शेणखतात मिसळून दिल्यास त्याचा अधिक फायदा होतो. पीक एक महिन्याचे झाल्यावर प्रति गुंठ्यास ६०० ग्रॅम युरियाचा दुसरा हप्ता द्यावा. वरील खते देणे शक्य न झाल्यास प्रति गुंठ्यास पेरणीच्या वेळी चार किलो सुफला (१५:१५:१५) अधिक दिड किलो बोरोनेटेड सुपर फॉस्फेट खत द्यावे.

### विरळणी व आंतरमशागत :

सुर्यफूलाच्या अधिक उत्पादनासाठी हेक्टरी रोपांची योग्य संख्या राखणे अतिशय महत्वाचे आहे. आपल्याकडे बरेच शेतकरी घन पेरणी करतात. त्यामुळे रोपे दाटीने वाढतात व अपेक्षित फुलांचा आकार मिळत नाही. म्हणून पेरणीनंतर १५ दिवसांनी विरळणी करावी. एका ठिकाणी फक्त एकच जोमदार रोप ठेवावे. दोन रोपांतील अंतर एक फूट ठेवावे. पीक पंधरा व तीस दिवसांचे असताना दातेरी कोळप्याच्या सहाय्याने कोळपणी करावी. आवश्यकतेनुसार पिकाची खुरपणी करुन शेत तणविरहित ठेवावे.